# बिनतारी संदेश

| | | |
|---|---|---|
| **संदेश घेणार** | :– | सर्व पोलीस उप आयुक्त, ठाणे शहर<br>सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त, ठाणे शहर<br>सर्व पो.स्टे/शाखा, प्रभारी अधिकारी, ठाणे शहर<br>राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, ठाणे शहर<br>पोलीस निरीक्षक, जलद प्रतिसाद पथक, ठाणे शहर<br>पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, ठाणे शहर |
| **माहितीसाठी** | :– | मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर.<br>सर्व मा.अपर पोलीस आयुक्त, ठाणे शहर |
| **संदेश पाठविणार** | :– | मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर |

जा.क्र./पो.उप.आयुक्त, मुख्या–२/३०७/२०२१, दिनांकः–२३/१२/२०२१

संदेश :–

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस भरती २०१९ च्या अनुषंगाने चालक पोलीस शिपाई भरती मधील पात्र उमेदवारांची मैदानी चाचणी परिक्षा दिनांक २८/१२/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ व पोलीस शिपाई मधील पात्र उमेदवारांची मैदानी चाचणी परिक्षा दिनांक ०३/०१/२०२२ ते दिनांक ०७/०१/२०२१ रोजी दररोज सकाळी ०६:०० वाजेपासुन साकेत पोलीस मैदान येथे घेण्यात येणार आहे.

सदर बंदोबस्ता करीता खालील नमुद तक्ता 'अ' मधील मनुष्यबळ संख्यानुसार सर्व परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांनी आपले अधिनस्थ येणारे सर्व पोलीस स्टेशन/शाखाचे प्रभारी अधिकारी यांचे कडून सदर बंदोबस्ताकरीता पोलीस अधिकारी/अंमलदार यांची माहीती संकलीत करून सदरची माहीती **तक्ता 'ब' मध्ये नमुद केलेल्या नुसारच मायक्रोसॉफ्ट एक्सेल मध्ये कृती देव ५० फॉन्टने तयार करून पीडीएफ न करता** सदरची माहीती पोलीस उप आयुक्त, मुख्यालय–२ यांचे ई मेल आयडी cp.thane.dcphq2@mahapolice.gov.in वर **आज १७:०० वा.पावेतो** तात्काळ सादर करावी.

➢ तक्ता 'अ' :–

| अ.क्र | परिमंडळ | पोलीस अधिकारी यांची संख्या | | | | पोलीस अंमलदार यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पोउपआ | सपोआ | पो.निरी | सपोनि/पोउपनि | |
| ०१ | परिमंडळ– १, ठाणे | ०१ | ०१ | ०१ | ०५ | २० |
| ०२ | परिमंडळ– २, भिवंडी | – | – | ०२ | ०५ | २० |
| ०३ | परिमंडळ– ३, कल्याण | – | – | ०२ | ०५ | २० |
| ०४ | परिमंडळ– ४, उल्हासनगर | – | – | ०२ | ०५ | २० |
| ०५ | परिमंडळ– ५, वागळे इस्टेट, | ०१ | ०१ | ०२ | ०५ | २० |
| ०६ | आर्थिक गुन्हे शाखा | ०१ | – | – | – | – |
| ०७ | विशेष शाखा | – | ०१ | – | – | – |
| ०८ | मानवी संसाधन विभाग | – | ०१ | – | – | – |
| ०९ | पोलीस मुख्यालय | – | ०१ | – | – | ४० |
| १० | बिनतारी संदेश विभाग | – | ०१ | ०१ | ०१ | १० |
| | **एकुण** | **०३** | **०६** | **१०** | **२६** | **१४०** |



Scanned with CamScanner

तक्ता 'ब' :—

| अ.क्र. | हुद्दा बक्कल नंबर | पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे संपुर्ण नाव | नेमणुक | मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

महत्वाची टिप :—

- सदर भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही नातेवाईकांचा सहभाग नाही केवळ अशाच पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नावे सदर बंदोबस्ताकरीता देण्यात यावी.
- ज्या पोलीस अंमलदार यांनी फोटोग्राफरचे व बायोमॅट्रीक मशिनचे प्रशिक्षण घेतलेले आहे अशा पोलीस अंमलदार यांची नावे सदर बंदोबस्ताकरीता देण्यात येऊ नये त्यांना फोटोग्राफरचा व बायोमॅट्रीकचा वेगळा बंदोबस्त लावण्यात येणार आहे.
- दिनांक २८/१२/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१, व दिनांक ०३/०१/२०२२ ते दिनांक ०७/०१/२०२२ च्या कालावधीत किरकोळ रजा, अर्जित रजा, गैरहजर, सिक रजा, तपासकामी बाहेर असणारे पोलीस अधिकारी/अंमलदार यांची नावे बंदोबस्ताकरीता पाठविण्यात येऊ नये.
- बंदोबस्ताकरीता पाठविण्यात येणारे पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे नाव डबल होणार नाही याबाबत खात्री करूनच यादी पाठवावी. बंदोबस्ताकरीता नेमण्यात आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बंदोबस्त नेमल्यानंतर परस्पर कोणीही बदल करू नये. सबळ कारण असल्यास बंदोबस्ताकरीता पर्यायी अधिकारी/अंमलदार संबंधितांनी उपलब्ध करून दयावेत.
- दिनांक २७/१२/२०२१ रोजी सकाळी ०९:०० वा.साकेत पोलीस मैदान येथे बंदोबस्ताची ब्रिफिंग व रंगीत तालीम घेण्यात येईल.

प्राधान्य :— त्वरीत

मा.पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर तथा अध्यक्ष,
ठाणे शहर पोलीस भरती समिती —२०१९
यांचे आदेशान्वये

( गणेश ना.गावडे )
पोलीस उप आयुक्त,
मुख्यालय—२, ठाणे शहर

प्रत:—

१ ए.एस कक्ष पोलीस प्रसिध्दीसाठी

Scanned with CamScanner